# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ सा.प्र./५३८/२०२५-२६ दि. २६/११/२०२५

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय** :- मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता अधिकारी/कर्मचारी यांना निवडणुक प्रक्रियेचे प्रशिक्षण देणे व इतर कामकाजाकरीता मानधनावर "तज्ञ अधिकारी" या पदाची जाहिर सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** :- मा. आयुक्त महोदय यांची दि. २३/११/२०२५ रोजीची मंजुरी.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता अधिकारी/कर्मचारी यांना निवडणुक प्रक्रियेचे प्रशिक्षण व कामकाजाकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर "तज्ञ अधिकारी" नेमणुकीबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि. २३/११/२०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सार्वत्रिक निवडणुक २०२५करीता तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर "तज्ञ अधिकारी" घेण्याबाबत जाहिर सूचना केलेली आहे.

सदरची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२६/११

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत - जाहिर सुचनेची प्रत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ सा.प्र./५३८ /२०२५-२६ दि. २६/११/२०२५

**सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता अधिकारी/कर्मचारी यांना निवडणुक प्रक्रियेचे प्रशिक्षण देणे व इतर कामकाजाकरीता मानधनावर "तज्ञ अधिकारी" या पदाची थेट मुलाखत (Walk In Section).**

## ।। जाहीर सूचना ।।

मा. आयुक्त तथा प्रशासक , मिरा भाईंदर महानगरपालिका हे, सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता अधिकारी/कर्मचारी यांना निवडणुक प्रक्रियेचे प्रशिक्षण व कामकाजाकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर "तज्ञ अधिकारी" हे पद थेट मुलाखतीदवारे (Walk In Selection) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेकरीता कळवित आहेत.

तज्ञ अधिकारी (मानधन तत्वावर) या पदापुढे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह दि. ०५/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते १.०० या कालावधीत मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प), जि.ठाणे- ४०१ १०१ येथे मुलाखतीकरीता उपस्थित राहावे

उपलब्ध पद संख्या :- ०१

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | "तज्ञ अधिकारी" (निवडणूकीकरीता) (मानधन तत्वावर) | ०१ | १) किमान १ निवडणूकीत प्रशिक्षण दिलेल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>२) शासकीय / निम शासकीय संस्थेत वर्ग- १ किंवा वर्ग- २ या पदांचा अनुभव असणे आवश्यक आहे. | रु. ४०,०००/- |

अटी व शर्ती :-

१) किमान १ निवडणूकीत प्रशिक्षण दिलेल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२) निवडणुक प्रक्रियेचे संपुर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) शासकीय / निम शासकीय संस्थेत वर्ग- १ किंवा वर्ग- २ या पदांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

४) प्रशिक्षण देणाऱ्या "तज्ञ आधिकारी" नेमणूक करताना मासिक भत्ता दरमहा रक्कम रु.४०,०००/- प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

५) नेमणूकीकरीता अर्ज करते वेळी तज्ञ अधिकाऱ्यास वयोमर्यादा बंधनकारक राहणार नाही.

६) सदर कामकाजाकरीता मानधनाने देण्यात येणारी नियुक्ती जास्तीत जास्त तीन महीन्यासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करता येईल.

७) नियुक्तीच्या कालावधीमध्ये सार्वत्रिक निवडणूकीकरीता असलेले सर्व प्रशिक्षण व कामकाज करण्याची जबाबदारी संबंधित "तज्ञ अधिकारी" यांची राहील व तसे हमीपत्र / बंधपत्र घेण्यात येईल.

८) मानधनावर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात / मनपा मध्ये सेवा समावेशना बाबत / सामावुन घेण्याबाबतचा अधिकार / हक्क नसेल.

९) मानधनावर नियुक्त करावयाच्या तज्ञ अधिकाऱ्या विरुध विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी नियुक्त तज्ञ अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील .

११) उमेदवाराने अर्ज भरताना राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावे.

१२) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर नियुक्त तज्ञ अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

१३) सदर जाहिरात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४) निवड प्रक्रिया :-

- "तज्ञ अधिकारी" या पदासाठी उमेदवारांची मुलाखत घेऊन गुणानूक्रमे निवड करण्यात येईल.

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# अर्जाचा नमुना

(पदाचे नाव :- ..........................................................................................)

प्रति,
मा. आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन , भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे :- ४०१ १०१

PHOTO

(१) संपुर्ण नाव : मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

१. आडनाव : ........................................ ...............................................

२. स्वत:चे नाव : ........................................ ...............................................

३. वडिलांचे / पतीचे नाव : ........................................ ...............................................

(२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण : ........................................................................................
पत्ता ........................................................................................
( पिन कोडसहित) ........................................................................................

संपर्कासाठी दुरध्वनी :
क्रमांक ........................................................................................

(३) अ) जन्मतारीख : तारीख महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) मुलाखतीच्या
दिनांक रोजीचे वय : ........................वर्ष.........................महिने......................दिवस

(४) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(५) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ : होय / नाही.
रहिवासी आहे काय ?

(६) शासकीय / निम शासकीय सेवेचा : वर्ग - १ अधिकारी .................... वर्ष सेवा
वर्ग - १ किंवा वर्ग -२ अधिकारी वर्ग - २ अधिकारी .................... वर्ष सेवा
सेवेचा तपशील.

(७) निवडणुक कामी काम केलेल्या सेवेचा तपशील :

(८) अवगत असणाऱ्या भाषा
( योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(९) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फ़ौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

(१०) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१)................................................ २)................................................

३)................................................ ४)................................................

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढ़ळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही/-